# वासाहातिक समाजातील शेतकरी प्रश्न
# जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या
# शेतक-यांचे शोषण या विषया वरील विचारांचा
# तुलनात्मक अभ्यास

## प्रकरण पहिले

## प्रस्तावना

# प्रकरण - १

## प्रस्तावना:

१९वे शतक हे भारताच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये एक वैशिष्टयपूर्ण शतक मानावे लागेल. या शतकामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. १९व्या शतकाची सुरवात मराठी राज्याच्या -हासाने झाली. इ.स. १८१८ हे वर्ष महाराष्ट्राच्या जीवनाला सर्वस्वी वेगळे वळण लावणारे वर्ष ठरले. याच वर्षी महाराष्ट्रामध्ये परकीय सत्ता स्थापन झाली. ही परकीय सत्ता इतर सत्तांपेक्षा वेगळी होती. मागास देशात आपल्या राजकीय वसाहती स्थापन करणारी ही जगद्व्याळ भांडवलशाही सत्ता होती. त्यामुळे महाराष्ट्राला जागतिक बाजारपेठेस जोडण्याची क्रिया आता जास्त जलद गतीने सुरु झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्र इंग्रज वसाहतवाद्यांच्या ताब्यात गेला आणि महाराष्ट्राच्या प्राचीन शेती व्यवस्थेमध्ये काही मूलभूत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न इंग्रजांनी सुरु केला. कारण त्यांना भारतातील शेतीव्यवस्थेला पश्चिमेकडील भांडवलशाही बाजारपेठेला जोडावयाचे होते. बंगाल प्रांतात युरोपीय पध्दतीची जमीनदारी पध्दत निर्माण करुन त्यांनी शेती व्यवस्थेची पुनर्रचना सुरु केली. पण महाराष्ट्रात मात्र जमिनदारी व्यवस्था त्यांनी लागू न करता रयतवारी पध्दत सुरु केली. शेतक-याला त्याचे वैयक्तिक मालकी हक्क प्रदान करण्यात आले. त्यातून अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी शेतकरी पूर्णपणे वसाहती व्यवस्थेत नाडला व

पिडला गेला होता. इंग्रज सरकार, सावकार, कमिशन, एजंट आणि व्यापारी यांच्यामुळे तो सर्वांगाने नागवला गेला. त्यामुळेच १८७३-७४ साली नगर, पुणे, सातारा जिल्ह्यात रयतेने उठाव केला. अनेक सावकारांना त्याची तोशीष सहन करावी लागली.

मराठी शेतकऱ्यांच्या या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न अनेक लोकांनी केला. रानडे यांच्या नेतृत्वाखाली पुणे सार्वजनिक सभेने त्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले. महाराष्ट्रातील दोन थोर पुरुष म. जोतीराव फुले आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी या प्रश्नाचा खोलवर विचार केला होता. वसाहत कालीन महाराष्ट्रातील शेती प्रश्नाचा त्यांनी केलेला विचार तौलनिक दृष्टया अभ्यासिण्याचा या लघुप्रबंधाचा मर्यादित उद्देश आहे.

इंग्रज येण्यापूर्वी महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारण स्थिर अशा ग्रामप्रधान शेतीव्यवस्थेवर आधारलेले होते. या रचनेला सुरुंग लावण्याचे कार्य इंग्रजानी सुरु केले.

१) इंग्रज येण्यापूर्वी महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था:

सध्याच्या महाराष्ट्रामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, कोकण व मराठवाडा या चार मराठी भाषिक प्रदेशांचा समावेश होतो. महाराष्ट्राचा आकार त्रिकोणाकृती आहे. उत्तरेस सातपुडा, दक्षिणेस पंचगंगा, पूर्वेस वैनगंगा तर पश्चिमेस अरबी समुद्र अशा महाराष्ट्राच्या सर्वसाधारण सीमा आहेत. पण १९व्या शतकाचा विचार केल्यास त्यात मुंबई, कोकण व पश्चिम महाराष्ट्र या मर्यादित

प्रदेशाचा समावेश होता. मराठी भाषिक प्रदेशात प्राचीन काळापासून एक सूत्रता अशी नव्हतीच, त्याला ऐतिहासिक आणि भौगोलिक परिस्थिती कारणीभुत होती. या प्रदेशावर शालीवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव इत्यादी हिंदू घराण्यांनी राज्य केले. त्यानंतर बहामनीचे राज्य आले नंतर शिवाजीचे राज्य स्थापन झाले. या राज्यावर १८व्या शतकात पेशव्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पण १७६१ च्या पानिपतच्या पराभवापर्यंत विविध मराठी सरदारांनी मराठ्यांच्या राज्याचा भारतभर विस्तार केला. मोठे साम्राज्य वाढविले. पण १७६१ नंतर हळूहळू सत्ता मोडकळीस आली. दुसऱ्या बाजीरावाचा पूर्ण पराभव (१८१८) झाल्यानंतर हा प्रदेश पूर्णपणे ब्रिटिश अमंलाखाली आला. पेशवाई खालसा झाली. पण जुन्या राजवटीचे अवशेष अनेक छोटया संस्थानिकांच्या रूपाने कायम राहिले.

या काळात महाराष्ट्र हा इतर प्रांताप्रमाणेच शेतीप्रधान होता. खेडे हाच स्वयंपूर्ण घटक होता. खेड्यामध्ये जाती संस्थेनुसार उपजीविका ठरत होती. प्रत्येक खेड्यामध्ये शेतकरी व शेतीसाठी लागणाऱ्या आणि इतर जीवनावश्यक वस्तु निर्माण करणारे कारागीर असत. ही बलुतेदारी पध्दत ग्रामीण जीवनाच्या स्थैर्याचे कारण होते. सर्व जनता परस्परावलंबी होती. जीवनमान फारसे उच्च दर्जाचे नसले तरी अगदी बकाल दारिद्र्यही नव्हते.

ब्रिटिश पूर्व काळामध्ये गावचा कारभार पाटील व कुलकर्णी पहात होते. खेड्याचा प्रमुख पाटील होता. त्यामुळे गावातील सर्व घडामोडीला तो जबाबदार असे. तोच या सर्व बाबतीत महत्त्वाची

भूमिका बजावत होता. गावातील तंटे, पंचायत सोडवत होती. या पंचायतीचे सदस्य हुषार, प्रभावी, वयस्कर, कुणबी होते. गावातील बलुतेदारांचा एक वर्ग होता. तो गावासाठी कामकरी, त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला सुगीमध्ये देण्यात येत असे. "गावातील शेतसारा जमा करण्याचे काम पाटलाकडे होते. तर तो ठरविण्याचा अधिकार मामलेदार व देशमुखांचा होता."[१]

इंग्रज भारतात येण्यापूर्वी प्राचीन भारतात आणि महाराष्ट्रात अनेक राजे होऊन गेले. प्रत्येक राजाच्या कालावधीमध्ये शेतीव्यवसायावर कमी जास्त प्रमाणात प्रभाव पडत गेला. काही राज्यांच्या काळात शेती व्यवस्थेमध्ये शेतीव्यवसायाला चालना मिळाली तर काही राजांच्या कालावधीत शेतीव्यवसायावर अनेक अरिष्टे आली. काही राजांनी किंवा बादशाहानी शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवले. सुलतानांच्या काळात सुलतान तात्त्विक दृष्टया स्वत:च साम्राज्यातील सर्व जमिनीचा मालक समजत असे. यामुळे शेतकऱ्याला उदरनिर्वाहासाठी आवश्यक तेवढे उत्पन्न सोडून बाकी सर्व उत्पन्न सरकारी गोदामात भरावे लागे. करगोळा करण्याच्या बाबतीत कोणतेही पक्के नियम नव्हते, महसूल अंदाजे ठरविला जाई, व त्यानुसार तो वसूल केला जाई. यामुळेच जमीनदार मुकादम इत्यादी अधिकारी शेतकऱ्यावर अरेरावी करत, त्यांची सक्तीने आर्थिक पिळवणूक केली जात होती. दिल्लीचा सुलतान शेरशाहा सुरी याच्या लक्षात ही गोष्ट आल्यावर शेतकऱ्यांना जमीनदार व मुकादमाच्या प्रभावातून मुक्त करून त्यांना सुखी करण्यासाठी तसेच कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी कराची योग्य ती आकारणी करण्याचे

त्यांने ठरविले. त्याच्या मते शेतकऱ्याला अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देता यावे म्हणून त्याच्या जवळ काही उत्पन्नाचा हिस्सा असणे आवश्यक आहे. त्याने आपल्या राज्यातील सर्व जमिनीचे सिकंदर याडांच्या साह्याने मापन केले. बिघा हे त्या काळाचे सर्वमान्य प्रमाण होते. भूमापनानंतर सर्व जमिनीचे रजिस्टर मध्ये नोंदणी केली जाई. जमिनीतून निघणाऱ्या धान्याची प्रतवारी सूचि केली जाई. जमिनीतून एकंदरीत उत्पादनाच्या आधारे प्रत्येक बिग्यातून निघणारे सरासरी उत्पन्न काढण्यात येत असे, व त्या आधारावर महसूल ठरविला जाई. हा महसूल साधारणपणे शेतकऱ्याच्या उत्पन्नाच्या १/४ भाग होता. हा शेतसारा धन व धान्य मोबदल्यात देण्याची मुभा होती.

शेरशाहाने शेतकऱ्यांच्या स्थितीत बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या परंतु शेरशाहाचा मृत्यू आणि अकबराचे सत्ताग्रहण या काळातील गोंधळामुळे महसूल प्रशासनाची घडी पूर्णपणे बिघडली होती. १५७० ते १५८० या दशकात जमिन महसुल पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने अकबराने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. यासाठी अकबराने राजा तोडरमल याच्या साह्याने स्वतंत्र महसूल व्यवस्था निर्माण केली. यानुसार भूमीचे मापन, वर्गीकरण, शेतसारा निश्चित करण्यात आला. या पध्दतीची जमिनीचे मोजमाप जमिनीचे वर्गीकरण, महसून आकारणीचे तत्त्व, धनधान्य, महसूल प्रमाणे, महसुली वसुली इत्यादी वैशिष्टये होती.

महाराष्ट्राच्या महसूल पध्दतीमध्ये अहमदनगरच्या निजामशाहाचा दिवाण मलिक अंबरने अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्याच्याच

पावलावर पाऊल ठेवून अनेक नव्या सुधारणा त्यानंतर शिवाजीने घडवून आणल्या. डॉ. बाळकृष्णाच्या मते "विजयनगर, निजामशाही आदिलशाही व मोंगलशाही अशा चार साम्राजातील पद्दतीचा मिलाफ करण्याचे अवघड काम शिवाजीपुढे होते." त्याचा योग्य तो मिलाफ शिवाजीने केला. मध्ययुगीन महाराष्ट्रात शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळेच शिवाजीने महसूल पद्दतीला विशेष प्राधान्य दिले. छ. शिवाजीने आपल्या कारकिर्दीत स्वराज्यातील शेतीचे तीन वेळा मोजमाप केले. जमिन मोजण्याची पद्दत, रयतवारी पद्दत जमिनीची वर्गवारी पिकनिहाय सारा इत्यादी महत्त्वाची वैशिष्ट्ये शिवाजीच्या महसूल पद्दतीची होती.

पेशावेकालीन व्यवस्थेमध्ये शेतीव्यवसायामध्ये फारशा नव्या सुधारणा झाल्या नाहीत. परंपरागत शेतीव्यवसाय चालू होता. त्यामुळेच शेतीचे उत्पादन वाढत नव्हतें. अशातच वारंवार पडणा-या दुष्काळामुळे उत्पन्न वाढीस खीळ बसत होती. त्याचप्रमाणे पुढे पेशवाई मध्ये सारावसुलीबाबत कोणतेही नियम राहिले नाहीत, कारण आर्थिक आघाडीवर पेशवाईत कोणतेही नियोजन नव्हते. शेतीव्यवसायाला कोणत्याही प्रकारच्या सुविधा उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहन असे काहीही नव्हते. त्यामुळेच शेतीव्यवसायात या काळात सुधारणा झाली नाही. गावातील शेतीचे उत्पादन हे त्या गावातील अर्थव्यवस्थेचा कणा होता. पण सतत फुगत जाणारा सरंजामदार वर्ग, सावकारां-कडून कर्ज घेऊन त्या मोबदल्यात एका प्रदेशातील महसूल वसूल करण्याचे त्यांना दिलेले अधिकार, सततच्या लढाया व लूटमार यामुळे या काळात शेतीव्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले नाही. जुन्याच परंपरा चालू राहिल्या सरंजामदारांचा जाच मात्र वाढला.

ब्रिटीश पूर्व काळामध्ये शेतक-यांकडून जमिन महसुलाच्या रूपाने जो पैसा राज्याच्या खजिन्यात जमा होई, त्यापैकी फारच थोडा अंश शासनाकडून त्यांच्यासाठी खर्च होत होता. कारण त्या काळी ग्रामीण भागाच्या संदर्भात परचक्र निवारण आणि शांतता रक्षण एवढेच सामान्यत: राजाचे कर्तव्य मानले जात होते. शिक्षण, शेती सुधारणा, वैधकीय मदत यांच्या बाबतीत खेड्यातील जनतेची शासनाकडून कोणतीच अपेक्षा नव्हती. त्यांच्या या गरजा ग्रामसंस्थेच्या पु-या होत होत्या. मध्ययुगातील राजे रजवाड्यांचे ऐश्वर्य व धनसंपत्ती ही युध्दातील लुटीचा ऐवज सोडला, तर गरीब शेतक-यांच्या पिळवणुकीतूनच त्यांना प्राप्त होत होता. सरकारी खजिन्यात जमा झालेला पैसा राजेरजवाड्यांची ख्याली खुशाली, फौजफाटा, देवस्थानांची इनामे, शास्त्री पंडितांना पुरस्कार व उमराव, सरंजाम व मानमरातब इत्यादी अनुत्पादक बाबीसाठीच खर्च केला जात होता. शेतीचे उत्पादन कसे वाढवता येईल या प्रश्नाच्या बाबतीत येथील राजे, जहागिरदार व वतनदार यापैकी कुणालाच खास आस्था नव्हती. कराच्या ओझ्याखाली शेतकरी दडपला गेला होता. यामुळे शतकामागून शतके गेली तरी महाराष्ट्रामधील शेती मध्ये कोणत्याच सुधारणा झाल्या नाहीत.

इंग्रजी राज्य महाराष्ट्रात स्थापन झाले त्यावेळी सावकार, सरंजामदार, ब्राहमण, भटीभक्षक, ठग आणि पेंढारी यांच्या उपद्रवामुळे शेतकरी त्रासलेला होता. पेशवाईच्या काळात ब्राहमण सावकार वर्ग व सरंजामदार वर्ग उदयास आले आणि इग्रजी अमंलात देखील समाजावर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.[4]

३) इंग्रजी राज्य आणि त्याचे महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेवरील परिणाम:

ब्रिटीशांचे राज्य महाराष्ट्रावर प्रस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्रातील ब्राहमणवर्गास त्याचे वैषम्य वाटणे सहाजिकच होते कारण पेशवाईचा त्यांना मोठा फायदा झाला होता. पण ब्राहमणातील एका मटाने त्याचे स्वागत केले. बाळाजीपंत नातू हा त्यांचा पुढारी, या वर्गाने झपाट्याने इंग्रजी शिक्षण घेऊन शासनातील खालच्या पातळीवरच्या नोकऱ्या पत्करण्यास सुरुवात केली. मात्र इंग्रजी राज्याचा खरा वाईट परिणाम येथील बहुसंख्य मराठा व तत्सम समाजावर पडला कारण इंग्रजी राज्यात शेतीवर कर वाढले व त्याचबरोबर लाखो मराठी शिपाई पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड यांचा पाडाव झाल्यामुळे व त्यांची सैन्यसंख्या अतिशय कमी झाल्यामुळे पुन: शेतीक्षेत्रात परतले. कारण त्यांना काम राहिले नाही. असा प्रकार झाला. त्यामुळे शेतीतील उत्पन्न कमी व खाणाऱ्यांची तोंडे जास्त त्यामुळे शेतीचा खरा प्रश्न जास्त बिकट बनला. म.फुले यांनी असे अनुमान केले आहे की, "शेतीवर त्यामुळे जवळजवळ वीस ते पंचवीस लाख लोकांचा बोजा पडला."[३]

मध्ययुगातील राज्यकर्ते साऱ्याची आकारणी करताना खेडे हाच घटक धरत होते. प्रत्येक खेड्यातील एकूण सारावसुलीचे काम पाटील, कुलकर्ण्यांकडे होते. ब्रिटीश पूर्वकाळात महाराष्ट्रामध्ये जमिनीची मालकी हक्क नव्हता. सरंजामशाही मध्ये तो काही प्रमाणात काही लोकानांच होता. जमिनीची खरेदी विक्री करता

येत नव्हती. त्याचप्रमाणे कोणात्याही व्यक्तीची जमिनीवर मालकी नव्हती का वारसा हक्क नव्हता. मात्र ब्रिटीशांनी या पध्दतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केला. त्यानी जमिनी मधून जास्तीत जास्त कर गोळा करण्याचे धोरण स्वीकारले. ब्रिटीश आमदानीत रयतवादी पध्दतीत जमिनीच्या खाजगी मालकीचे तत्त्व मान्य केले. यामुळे स्वत:च्या शेतीवरील सारा भरण्याची जबाबदारी गावटलाऐवजी व्यक्तिश: प्रत्येक शेतक-यांवर येऊन पडली. यामुळे महसुलाच्या सामायिक जबाबदारीचे तत्त्व संपुष्टा आले, ग्रामसंस्थेला उतरती कळा लागली व शेतकरी एकाकी पडला. भांडवलशाहीतील खाजगी मालकीचे तत्त्व कृषी क्षेत्रास लागू केल्यामुळे खेड्यातील अर्थव्यवहारात फार मोठा बदल झाला आणि यामधूनच शेतीच्या -हासाला आणि शेतक-याच्या अवनतीस प्रारंभ झाला. इंग्रजानी आपल्या काळात नवीन धारा पध्दती अमंलात आणाली. जमिनीच्या प्रत्येक तुकड्याची मोजणी करुन त्याला भूमापन क्रमांक दिला. प्रत्येक खेड्याचा नकाशा तयार केला. प्रत्येक तुकड्यावर महसूल कट्ट करण्यात आला व त्यानुसार महसूलाचे दर तीस वर्षापर्यंत कायम करण्यात आले."[४]

ब्रिटीशांचे राज्य आल्यामुळे देशात शांतता प्रस्थापित झाली. पण त्यामुळे बेकारी प्रचंड प्रमाणावर वाढली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेत जमिनीवर त्यांचा भार पडला. शांततेच्या काळात लोकसंख्या वाढली. या वाढत्या लोकसंख्येमुळे कुटूंबाची संख्या वाढली, वाढत्या कुटूंबामुळे शेतजमिनीचे तुकडे पडले. हे शेतजमिनीचे पडलेले तुकडे एवढे लहान होते की, त्यामुळे शेतीतून मिळणा-या उत्पन्नातून कुटूंबाचे आणि गुराढोरांची गुजराण करताना शेतक-यांना

नाकी नऊ येत होते. शेतजमिनीचे जे अनेक तुकडे पडले होते त्यामुळे ज्यांच्या जवळ शेत जमिन कसण्यासाठी बैल व अवजारे नव्हती त्यांनी ते तुकडे ज्या शेतक-यांजवळ नांगर नि बैल होते त्यांना कसावयास किंवा विकत दिले आणि भूमीहीन शेतकरी सुताराकडे, लोहाराकडे उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून वणावण फिरत होते. गव्हाच्या किंवा तांदळाच्या कोंड्यावर व आंब्याच्या कोंड्यांवर कशी बशी गुंजारणा करत होते. त्यामुळे फुले लिहितात की, "जंगल खात्याने ग्रामीण भागातील कुरणे ताब्यात घेतली त्यामुळे शेळ्या, मेंढयाना चारावयास जागाच शिल्लक राहिली नाही."[५] शेतक-यांचा हा जोडधंदा ही बंद पडला. शेतक-यांना यामुळे आधारासाठी पडीक जमिन सुध्दा उरली नाही. थोडक्यात अपुरे क्षेत्र, लोकसंख्येचा वाढता भार आणि मागास शेती उत्पादन पध्दती यामुळे येथील शेतीव्यवसायाचे मागासलेपणा कायम राहिले.

ईस्ट-इंडिया कंपनीचे मुख्य धोरण म्हणजे जमिनीवर मोठ्या प्रमाणावर करलादून तो गोळा करणे हे होते. यासाठी त्यांनी रयत वारी पध्दतीचा आवलंब केला व शेतसारा तीस तीस वर्षासाठी एकदाच लागू केला. काही वेळा सारा हा जमिनीतील माती व त्यामध्ये असणा-या पिकावरही अवलंबून होता. १८३६ मध्ये पुणे जिल्हयातील इंदापूर तालुक्यातील ही योजना अमंलात आणली. कर हे पैशाच्या रुपाने गोळा केले जात, ब्रिटिश आमदानीत एकंदरीत व्यवहार पैशाच्या रुपात चालू झाल्यामुळे सारा भरण्यासाठी व आवश्यक वस्तूंच्या खरेदी-साठी स्वत:जवळचे धान्य विकण्याची शेतक-यावर पाळी आली आणि यामुळेच तो मध्यस्थाच्या व कमिशन एजंटच्या कचाटयात सापडला.

शेतीच्या व्यापारीकरणाचीही सुरवात ब्रिटीश कालावधीत लगेच झाली त्यामुळे ब्रिटीश राजवटीनंतर पहिल्याच दशकात अन्नधान्य उत्पादनापेक्षा व्यापारी पिकावर भर देण्यात सुरवात झाली. शेतकरी आपल्या उत्पादनाच्या मोठा भाग बाजारात आणू लागले.[६] "व्यापारी पिकामुळे त्यांचे उत्पादन वाढले पण त्याचा खरा फायदा त्या पिकांना असलेल्या मागणीमुळे व्यापारी व सावकार यांचा झाल."[७] मात्र यामुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवू लागला, की ज्यामुळे सर्व सामान्य शेतक-याना जीवन जगण्यासाठी जास्त किंमतीने धान्य खरेदी करावी लागू लागले.

इंग्रजांच्या महसूल पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे महसूल हा पैशाच्या रुपाने गोळा केला जायचा. या ठिकाणी पिकाचा विचार न केल्यामुळे शेतक-यांच्यावर मोठा आर्थिक बोजा पडत होता. डॉ. ताराचंद्र यांच्या मते "रयतवारी पद्धतीखाली येणारी ५२% पिकाऊ जमीन आणि रयतवारीचे वर्चस्व असणा-या भागामधील परिस्थिती ही अतिशय वाईट होती. उदा. मुंबई आणि मद्रास या प्रांतामधील १८६६ च्या सुधारीत मुंबई प्रेसिडन्सी अॅक्ट नुसार केलेली शेतसारा मधील वाढ इतकी मोठी होती कि ते जबर भाडेच वाटावे. यामुळे शेतसारा भरल्यानंतर तसेच शेतीचा खर्च भागवल्यानंतर शेतक-याजवळ कसलेही जादा (फायदा) उत्पन्न शिल्लक राहत नसे.[८] मि. एलीफस्टन हाऊस ऑफ कॉमन्सच्या कमिटी पुढे भाषण करताना म्हणाले, "जमिनीच्या व्यवस्थापनामधील महत्त्वाची कमतरता म्हणजे मोठ्या प्रमाणात असणारे जमिनीवरचे कर.[९] कर पद्धतीमुळे कराची रक्कम ही ठराविक वेळेतच भरावी लागे. जरी सुगी दुष्काळामुळे किंवा अन्य काही कारणाने अयशस्वी झाली तरी सुद्दा

कर भरावाच लागे. महसूल ठराविक मुदतीत भरला गेला नाही तर जमिनीचा लिलाव करून तो वसूल केला जाईल अशी शेतक-यांना शासनाकडून सक्त ताकीद मिळत होती. याचाच परिणाम म्हणजे शेतकरी आपली जमिन सरकार पासून वाचविण्यासाठी सावकारांच्या-कडून कर्ज घेत होते. सावकार हे पैसे भरमसाठी व्याजाने आनंदाने देत असत. यातच भर म्हणजे ब्रिटीशांचे कायदे हे पूर्णपणे सावकारशाही-ला पूरक व शेतक-यांच्या विरुद्द होते. इंग्रजाच्या पूर्वी जर सावका-रांची स्थिती पाहिली तर ती बरीच कुमकूवत होती. शिवाय त्यांना इतरांची जमिन हडप करता येत नसे. परंपरेप्रमाणे मुदलाच्या इतकेच जर व्याज झाले तर दामदुप्पट वहिवाटी प्रमाणे त्यास जास्त पैसा वसूल करता येत नसे. ते प्रामुख्याने खेड्यातील हिशेब ठेवणारे छोटेसे दुकानदार होते. त्यांच्यावर पंचायतीचा अंकुश होता. मात्र सरकारच्या कर पद्दतीमुळे जमिन वाचविण्याच्या धडपडीतून शेतकरी मोठ्या व्याजाने पैसे घेऊ लागले, त्यामुळे ब्रिटीश आमदानीत सावकार गब्बर बनले. शेतक-यांच्या वाढत्या कर्जामुळे ते पूर्णपणे सावकारांच्या वर्चस्वाखाली गेले. कर्ज न फेडता आल्यामुळे तारण ठेवलेल्या शेतक-यांच्या जमिनीचे मालक सावकार बनले. "भरमसाट व्याजामुळे जमिनीचे हस्तांतरण सुलभ झाले."[१०] या काळात सावकारी हा धंदा होऊन बसला.

आणखी एक महत्त्वाचा परिणाम महाराष्ट्राच्या शेतीवर झाला. तो म्हणजे शेतीचे व्यापारीकरण झाले. ब्रिटीश राज्य स्थापनेनंतर भारत जागतिक बाजारपेठाशी जोडला गेला कि ज्यामुळे ब्रिटीशांनी आपल्या मुख्य व्यापारी हेतुचा फायदा करून घेता आला. शेतीच्या व्यापारीकरणामुळे महाराष्ट्रातील परंपरागत पीक पद्दत

नष्ट होऊन त्या ऐवजी भांडवलशाहीला फायदेशीर अशी उत्पादन पध्दत सुरु झाली. यामुळेच शेती उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये भांडवल गुंतविण्यास सुरवात झाली. याचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे भांडवल गुंतवणे सामान्य शेतकऱ्यास अशक्य झाले. याचा पूरेपूर फायदा श्रीमंत शेतकरी व सावकारांनी घेतला. यामुळे गरिब शेतकरी व शेतमजूर यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. येथील शेतीचे व्यापारीकरण झाल्यावर ब्रिटीशांनी ब्रिटनमधील भांडवलदारांना मदत करण्यास सुरवात केली. यासाठी त्यांनी प्रचंड प्रमाणात महसूल आकारला यामुळे शेती व्यवसायाचा प्रश्न अतिशय बिकट बनला. याचा फायदा सावकारांनी घेतला. सावकारांना संरक्षण देणारे कायदे व मोठ्या प्रमाणावर महसूल यामुळे शेतकरी वर्ग अस्वस्थ झाला. त्यातूनच शेतकऱ्यांची बंडे झाली याचाच परिणाम म्हणून ब्रिटीशांनी सावकारांवरती काही बंधने घालणारा १८७९ चा "दख्खन अॅग्रीकल्चर अॅक्ट" पास केला. परंतु याचा शेतीव्यवसायावर व सावकारशाहीला आळा घालण्यावर फारसा परिणाम झाला नाही.

ब्रिटीश काळातील शेतकरी समाजाची अवस्था वर्णन करताना फुले म्हणतात, "जरी शेतकरी आणि त्याचे कुटुंब हे अष्टौप्रहर राबत होते, तरी त्यांचे सर्वांचे मिळून मासिक वेतन ३१ (एकतीस) रुपये होते. तर एकटा युरोपियन अगर एतद्देशीय अधिकारी आपल्या चैनीवर दर महिन्याला १५ (पंधरा) किंवा अधिक रुपये खर्च करतो. इंग्रज सैनिकाचे उत्पन्न प्रामाणिक कष्टाळू अशा हिंदी शेतकऱ्याच्या उत्पन्नापेक्षा १० पटीने अधिक असते."[११]

थोडक्यात रयतवारी पद्दत महाराष्ट्रात स्थापन होऊनही शेतक-यांचे दैन्य कमी झाले नाही.

४) रयतवारी पद्दत:

रयतवारी पद्दत म्हणजे रयतेला तिच्या जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित करुन देणारी पद्दत.ही पद्दत इंग्रजांनी महाराष्ट्रात लागू केली. या पूर्वीच्या जमिन व्यवस्थेमध्ये रयतवारी पद्दतीची काही बीजे अगदी सुप्तरित्या होती. कारण शेतीची मालकी अनेक कुटुंबात विभागलेली होती. पण खरेदी विक्रीवर पंचायतीचे नियंत्रण उत्पन्न परस्परात वाटून घेणारी बलुतेदारी पद्दत आणि सर्व गावावर सारा बसविण्याची पद्दती यामुळे भारतात जमिनीची सामूहीक मालकी होती असे काही विद्वानांचे मत होते. इंग्रजांनी या परिस्थितीत बदल घडवून आणला. इंग्रजांनी देशाच्या काही भागामध्ये जमीनदारी तर काही भागामध्ये वैयक्तिक मालकी हक्क निर्माण केला. यालाच रयतवारी या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये रयतवादी पद्दत चालू केली. रयतवारी पद्दतीमुळे जमिन महसूलामध्ये अनेक क्रांतीकारक बदल झाले. या रयतवारी पद्दतीची पुढील काही वैशिष्टये होती.

१) रयतवादी पद्दतीमुळे "जमिनीवर शेतक-याचा मालकी हक्क नाममात्र प्रस्थापित झाला."[१२]

२) कर प्रत्यक्ष शेतक-यांनी भरण्याची पद्दत सुरु झाली.

३) शेतक-यांच्या संमतीने जमिनीच्या खरेदी-विक्रीस प्रारंभ झाला

४) ब्रिटीशांना कर गोळा करण्याचा हक्क मिळाला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

५) जमिन धारणा करण्यासाठी महसूल देण्याची पूर्व अट.

६) २० ते ३० वर्षापर्यंत एकदाच महसूल ठरविला जाई पुन्हा मुदत संपल्यानंतर पुर्नरचना.

७) जमिनीचा महसूल देण्यासाठी जमिनधारक हा व्यक्तीशा: जबाबदार राहिल.

८) सर्व प्रकारच्या जमिनीवर (पडीक जमिन सहित) सरकारची मालकी.

९) शेतसारा मुदतीत न भरल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा हक्क सरकारला मिळाला.

प्रा. रविंद्र कुमार यांच्या मते जरी रयतवारी पध्दती ही प्रगतीशील अशी जमिन व्यवस्था होती. तरी ही तिचे परिणाम महाराष्ट्रात सर्वस्वी चांगले झाले नाहीत. उलट महाराष्ट्रात शेतक--यांची त्यामुळे जास्त पिळवणूक झाली. त्यामुळे एकोणिसाव्या शतका-च्या उत्तरार्धात रयतवारी जमिन व्यवस्था असणा-या भागात जास्त मोठ्या प्रमाणात सामाजिक व राजकीय असंतोष होता."[१३] या असंतोषातूनच नव्या सामाजिक व राजकीय चळवळी भारतात निर्माण झाल्या. १८८५ साली कांग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे भरले.

५) <u>महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती:</u>

शेतक-यांची दुरवस्था झाल्यामुळे या काळात त्यांचे परिणाम सामाजिक जीवनावर झाले. सामाजिक जीवनात त्या काळात ब्राह्मणांचे वर्चस्व वाढत होते व ते त्याच्या आधारे कूरपणे इतरांचा छळ करीत होते. शेतक-यांचे जीवन उत्तर पेशवाईत वाईट अवस्थेत होते. उत्तर पेशवाईतले तमाम सामाजिक जीवन सुध्दा निकृष्ठ अवस्थेला पोहोचले होते.

ह्या काळात पुण्यातील ब्राहमणांस फार मान आला होता व सोवळ्या ओवळ्याचा आचार विचार फारच वाढला होता. महार, मांग, चांभार, भंगी इत्यादी लोकांना रस्त्याने थुंकायची देखील बंदी होती. त्यांनी कंबरेस मडकी बांधून फिरावे. कोणी ब्राहमण रस्त्यात भेटला तर लागलेच खाली बसावे, कारण सावली पडता कामा नये असे त्यांचे हाल होते.[१४] सर्वसामान्य कष्टकरी आणि मजूर यांचा अतोनात छळ होत होता. "शेतक-यांना नि शेतावर राबणा-या कामक-यांना पेशव्यांचे अधिकारी व त्याचा दत्तक भाऊ अमृतराव हे छळून हैराण करीत असत. त्यांनी मागितलेली रक्कम शेतक-यांना देता आली नाही तर ते चांडाळ अमृतराव त्यांच्या मुलांच्या अंगावर उकळत्या कढईतील तेल ओती."[१५] एवढेच नव्हे तर तापल्या तव्यावर शेतक-यांना उभे केले जायचे, पाठीवरती दगडाची ओझी ठेवली जायची व त्यांना मिरच्यांचा धूर दिला जायचा. असे अनेक प्रकारचे जुलूम तात्कालीन प्रजेला भोगावे लागत होते.

"पेशवाई हे ब्राहमण प्रधान राज्य असल्यामुळे विद्येचा उत्कर्ष या काळात व्हावा असे कोणी म्हणाले, तर तोहि झालेला दिसत नाही. महाराष्ट्रातील ज्या काही शाळा होत्या त्या मोजक्या चार सहा शहरात त्यातही शास्त्रीय म्हणजे धर्मशास्त्रीय व वेदविद्येचे शिक्षण देत हे शिक्षण नव्या जीवनाला पूर्णत: निरुपयोगी ठरणारे होते. या मध्ये स्त्री शिक्षणाला अजिबात थारा नव्हता. स्त्रीची सर्वच क्षेत्रात कुचंबणा होत होती, "बालविवाह, वालजरठ विवाह, केशवपन इत्यादी रूढीमुळे स्त्री जातीची कुचंबणा चोहो अंगानी होत होती. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते, हा विचारच मुळी उदयास आलेला नव्हता. पति हीच स्त्रीची अंतिम गति, हे स्त्रीधर्माचे सार."[१६]

पेशवाई ही फक्त एका विशिष्ट वर्गाची म्हणजे सरंजामदार वर्गाची मक्तेदारी झालेली होती. उपजीविकेसाठी स्वतंत्र असे कोणतेही उद्योगधंदे नव्हते त्यामुळे सर्वसामान्य बहुसंख्य वर्गाची आर्थिक कोंडी झालेली होती. मजूरांची स्थिती तर बिकटच होती. या सर्व परिस्थितीकडे राज्यकर्त्यांनी प्रजेकडे केलेल्या दुर्लक्षामुळे असंतोषाचे वातावरण प्रजेमध्ये तयार झालेले होते.

वरील प्रकारे अधोगतीला गेलेल्या समाजजीवनात मुलभूत बदल होण्यासाठी काही प्रचंड उत्पात होणे अपरिहार्य असते. ब्रिटीश साम्राज्यवादाचे आक्रमण हा अशा त-हेचा उत्पात होता. पण ब्रिटीश हिंदुस्थानात आल्यावर राज्यसत्तेच्या सर्व ग्रासी स्वरूपाचे दर्शन येथील जनतेस घडले आणि या राज्यसत्तेने प्रजेच्या नियंत्रणासाठी जो नवीन सत्ताकेंद्रे प्रस्थापित केली व या केंद्रामुळे जी नवी बंधने निर्माण झाली त्यामुळे येथील पूर्वीचे संस्थात्मक जीवन हतप्रभ होऊ लागले."[१८]

इंग्रजांचे राज्य देशावर स्थापन झाल्यानंतर हळूहळू यात बदल घडून आला. वर्णवर्चस्वावर मर्यादा आल्या. सर्व जातींना इंग्रजी शिक्षण घेण्याची मुभा मिळाली. महारादि जातींना इंग्रजांच्या सैन्यात चाकरी करण्याची संधी प्राप्त झाली. अनेक जातीतून प्रज्ञावंत पुरुष निर्माण झाले. त्यांना इंग्रजांच्या अमदानीतील ब्राह्मणांचे सामाजिक व राजकीय वर्चस्व जाणवू लागले. त्यातूनच जोतीराव फुले, भाऊदाजी लाड, बाबा पद्मनजी, दादोबा पांडुरंग,भास्कर, पांडुरंग, बाळशास्त्री जांभेकर, मलबारी, लोकहितवादी, रानडे, सार्वजनिक सभेचे जोशी यांच्यासारखे समाजसुधारक व कर्तेपुरुष निर्माण झाले.

वरील प्रकारचे समाजसुधारक हे इंग्रजांनी येथे सुरु केलेल्या इंग्रजी शिक्षणातून व नवीन विचार प्रवाहामुळे निर्माणझाले. १९व्या

शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्राचा संपूर्ण चेहरा मोहराच बदलून गेला. शिक्षण प्रसारासाठी "बोर्ड आफ एज्युकेशन", "बाम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी" इत्यादी संस्थाची स्थापना झाली. पाश्चात्य वळणाच्या नव्या शिक्षणाने इंग्रजी विद्या पाश्चात इतिहास, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या अभ्यासाने महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूणांना अंतमुर्ख करून सोडले होते. आपल्या धर्माचा, समाजाचा, चालीरीतींचा अभ्यास करण्याची व त्यात सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली होती. या दृष्टीने या समाज सुधारकांनी प्रयत्न केलेत. त्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करण्याचा प्रयत्न केला. ब्राहमणशाहीचा जबरदस्त पगडा असलेल्या समाजाला अंधश्रध्दा, रूढीपरंपरा, विधवा पुनर्विवाह, बालविवाह, स्त्री-पुरुषांना शिक्षण अस्पृशांना शिक्षण, जातीभेद, परदेशी, प्रवासावरची बंदी, इत्यादी गोष्टीतून बाहेर काढून त्यांना एक नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न त्या काळच्या सर्व महाराष्ट्रीय समाज सुधारकांनी केला.

या समाज सुधारकांनी निरनिराळ्या प्रसार माध्यमातून, निरनिराळ्या सभा स्थापून, जनतेमध्ये चळवळी करून केले. यात प्रामुख्याने परमहंस सभा, सार्वजनिक सभा, सत्यशोधक समाज प्रार्थना समाज, आर्यसमाज, थिऑसॉफीकल सोसायटी, इत्यादी सभा व तिच्या सभासदांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी धार्मिक परंपरेच्या विरूध्द बंड केले.

जातीबंधन व रूढीवाद यातून मुक्त झालेल्या प्रत्येक मनुष्याला विचार, आचार व उपासना यांचे स्वातंत्र्य असले पाहिजे. जोपर्यंत

त्यांच्या वागण्यामुळे इतरांच्या हक्कावर गदा येणार नाही. त्याबरोबर समाजातील असंख्य लोकांच्या दुरवस्थेचे व दुःखाचे मूळ बहुतांशी त्यांच्या अज्ञानात आहे. त्यासाठी शिक्षण प्रसाराच्या सार्वत्रिक आवश्यकतेचा समाज सुधारकांनी पुरस्कार केला.

विषम व अन्यायाधिष्ठित सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी समाजसुधारकांनी प्रयत्न सुरू केले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या दुरवस्थेकडे काही लोकांचे लक्ष गेले.

६) **१९व्या शतकाचा उत्तरार्ध आणि महाराष्ट्राच्या शेतीची वाताहात:**

इंग्रजी राज्य भारतात आल्यानंतर दळणवळणाची नवी साधने अस्तित्वात आली त्यामुळे शेतमालाच्या व्यापारीकरणाला प्रारंभ झाला. केवळ कुटुंब पोषणासाठीच नव्हे तर रोकड पैसा पुरविण्यासाठी शेतीतील उत्पादन होऊ लागले. मुंबईच्या धर्तीवर अनेक औद्योगिक शहरांची वाढ होत गेल्यावर त्या त्या शहरांतून अन्नधान्याची मागणी येऊ लागली. तेंव्हा बाजारपेठेसाठी धान्य पिकविण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन मिळाले. यामुळे सुरवातीला काहीसा शेतीव्यवसायावर चांगला परिणाम घडून आल्याचे दिसते.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात येथील शेतीक्षेत्रात अनेक बदल घडून आले आणि येथील पीक पद्दती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेस जोडली गेली. त्यामुळे त्या बाजारपेठेतील तेजी मंदीचा मराठी शेतकऱ्याच्या जीवनावर भला बुरा परिणाम होऊ लागला. पुढे "अमेरिकेतील यादवी युद्द (१८६१-६५) च्या काळात शेतकऱ्याकडील कर्जाची रक्कम वाढत

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

गेली. तरीही शेतीमालाला त्या वेळी चांगला भाव मिळत असल्याने कर्जाची परतफेड करणे त्याला सहजशक्य होते परंतु सन १८७० नंतर पंचवीस वर्षे मंदीचा काळ आला. यादवी युद्ध संपून तह झाल्यावर युनायटेड स्टेटसमधील शेतीचे उत्पादन झपाटयाने वाढू लागले. त्यामुळे मागणीपेक्षा पुरवठा खूपच जास्त झाल्याने शेतमालाच्या किंमती एकदम घसरल्या, याचा परिणाम महाराष्ट्राच्या शेतमालाच्या किंमतीवर झाला. उदा. १८७१-७२ साली ज्वारीचा भाव रुपयाला २२ शेर व बाजरीचा रुपयाला २० शेर होता, तर १८७४-७५ साली ज्वारीचा भाव रुपयाला ४५ शेर व बाजरीचा ३५ शेर इतका खाली आला. यामळे शेतक-यांच्या रोकड उत्पन्नात घट झाली. रेल्वे बांधणीचे काम थांबल्याने शेतक-यांचा फावल्या वेळेतील रोजगारही बंद झाला. तीस वर्षानंतर १८६६ मध्ये नवी जमाबंदी झाली, त्यावेळी शेतीमालाच्या किंमती वरच्या पातळीवर होत्या. १८६६ मध्ये जी जमाबंदी झाली त्यानुसार पुढील तीस वर्षासाठी ठरविण्यात आली होती. १८६६ नंतर मात्र शेतमालाचे दर खाली आले. त्यामुळे सा-याचा बोजा शेतक-यांना असहय झाला. कर्जाची परतफेड करणे त्यामुळे त्यांना अशक्य होऊ लागले. "सावकारांनी कर्जवसुलीसाठी शेतक-याविरुद्द न्यायालयात जमिनी काढून घेण्यासाठी मोठ्या संख्येने खटले भरले. "एकटया पुणे जिल्हयांत जप्तीचे अर्ज १८६८ पासून १८७३ पर्यंतच्या सहा वर्षात १२००० पासून २८००० पर्यंत वाढले."[१९] खालील तालीकेवरून जमिनीच्या बाबतीत भरलेल्या खटल्याची संख्या दिसून येते. ही आकडेवारी १८५१ ते ६५ पर्यंतची आहे."[२०]

तालीका नं. १

| वर्ष | १८५१ | १८६१ | १८६५ |
|---|---|---|---|
| अहमदनगर | ९८ | ३१८ | ६८९ |
| पुणे | ७५ | २८२ | ६२२ |

कोर्टाचे कामकाज तालुक्याच्या ठिकाणी चालत होते. त्यामुळे वारंवार तारखा लागत. शेतीची कामे सोडून त्या त्या वेळी हजर राहणे शेतकऱ्याला अडचणीचे होत होते. न्यायालयातील शिरेस्तेदार कारकून, वकील, न्यायाधिश हे सर्व उच्चवर्णीय असल्यामुळे त्यांचा स्वाभाविकच कल सावकारांकडे होता. शेतकरी अशिक्षित व परिस्थितीने नाडलेला, शिवाय कराराच्या मूलतत्त्वांची त्याला बिलकूल माहिती नव्हती. सावकाराण्ढे ब्र काढण्याची त्याची हिम्मत होत नव्हती. या सर्व व्यवहारात अखेर त्याला आपली जमिन गमवावी लागत होती. याचाच परिमणाम म्हणजे १८७५-७६ साली पुणे, अहमदनगर, सातारा व सोलापूर जिल्हयांतील शेतकऱ्यांनी उठाव केला." [२१]

ब्रिटीश आमदानीत सावकारशाहीस अनुकूल व शेतकऱ्यांच्या विरुध्द असणारे कायदे यामुळे शेतीची वाताहात मोठ्या प्रमाणात झाली. शेतीची जुनाट पध्दत व ब्रिटीश काळात सारा वेळेतच भरण्याची सक्ती यामुळे शेतकरी सावकारांच्या कचाटयात सापडत होता. वेळेवर सारा न भरल्यास सरकारकडून शेती लिलावाची धमकी यास्तव शेतकरी सावकारांच्याकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेई . या कर्जाचे व्याज ही मोठ्या प्रमाणात होते. काही ठराविक मुदतीवर

घेतलेले हे कर्ज जर सुगी चांगली झाली नाही तर तसेच व्याजापोटी वाढत राही, कारण सावकारांचे पैसे परत करणे हे सर्वस्वी शेतीवरच अवलंबून होते. यामुळेच सुगीमध्ये धान्यकमी निघाल्यास सावकाराचे पैसे देणे शक्य होत नसे, त्यामुळे थकबाकी वाढत जात होती. अशा-प्रकारे हळूहळू शेत सावकारांच्या ताब्यात जाई व सावकार गब्बर बनत तर शेतकरी कंगाल होत. जबर शेतसा-यामुळे या काळात सावकारी हा धंदाच होऊन बसला होता. यामुळे "शेतक-यांच्या ताब्यातून हळूहळू जमिन कमी होत जाऊन ती सावकार व जमिनदारांच्याकडे वाढू लागली. यामुळेच कुळांची संख्या वाढली, त्यामुळे दलालाना पैसे आणि धान्याच्या स्वरूपात भाडे देणा-या कुळांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परंपरागत भाड्याच्या ऐवजी अस्तित्वात आलेले स्पर्धात्मक भाडे, जमीनदारांचे कुळांना स्वच्छंदीपणाने हाकलून देण्याचे प्रकार घडत होते. यामुळेच शेतीची व पर्यायाने शेतक-यांची मोठी दयनीय अवस्था झाली होती."[२२] श्री. जीव्ही. जोशींच्या म्हणण्यानुसार "मुंबई मध्ये जमिन धारकांनी आपले कुळाचे हक्क गमावले होते आणि म्हणून त्यांना १८९४ च्या कायदयानुसार ऐच्छिक कुळ म्हणून जाहिर केले होते."[२३]

दख्खन मधील शेतक-यांची बंडे:

१८७३-७४ साली शेतक-यांची दयनीय परिस्थिती झाली होती. सरकार व सावकार यांच्या दुहेरी चक्रात तो पिळला जात होता. पुणे, अहमदनगर, सातारा वगैरे जिल्हयांत तर परिस्थिती फारच गंभीर झाली होती. या सर्व संकटावर उपाय म्हणून या जिल्हयात रयतेने उठाव केला. गुजर, मारवाडी व ब्राहमण सावकारांच्या पेढया त्यांनी जाळल्या त्यांच्या जमिनी लिहून घेतलेले कागद त्यांनी जाळले. या उठावामुळे

ग्रामीण भागात वातावरण किती तापलेले आहे याची जाणीव इंग्रज सरकारास झाली. विशेषत: कॉंग्रेसची स्थापना करण्यामागे या ग्रामीण असंतोषास वाट मोकळी करुन देणे हा एक ह्यूम यांचा उद्देश होता." [२४]

दुष्काळ:

१८७४मध्ये इंग्लंडमध्ये टोरीपक्ष अधिकारावर येऊन इ.स. १८७६ पासून भारतात लिटनशाही सुरु झाली. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आली होती. आयात मालावरील जकात रद्द झाली. यामुळे उगवत्या हिंदी कापडधंद्यावर आपत्ती आली. अफगाण मोहिमेच्या खर्चापोटी आलेली तूट भरु काढण्यासाठी नवे कर लसविले गेले. [२५] यातच १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला. त्याची मोठी झळ महाराष्ट्राला पोहचली. १८७७-७८ मध्ये मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात पडलेला दुष्काळ तर फारच भयंकर होता. या दुष्काळामध्ये पाच-सहा लाख लोक भूकेने तडफडून मेले होते. साधारणपणे पुढील "तालिका वरुन वारंवार पडणाऱ्या दुष्काळामध्ये भूकेने मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या लक्षात येईल.

तालिका २ [२६]

| वर्ष | मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या |
|---|---|
| १८००-१८२५ | १०,००,००० |
| १८२५-१८५० | ४,००,००० |
| १८५०-१८७५ | ५०,००,००० |
| १८७५-१९०० | १,५०,००,००० |

वरील प्रमाणे मृत्यूमुखी पडलेली माणसे याचा प्रामुख्याने ब्रिटीश सरकारचे अन्नधान्य विषयक धोरणच कारणीभूत ठरले. येथे दुष्काळ पडून, अन्नधान्याचा तुटवडा असून सुध्दा सरकारने या कालावधीत मोठ्या प्रमाणात गहू व मालाची निर्यात केली उदा. पुढील तालिकेवरून हे स्पष्ट होईल.

तालिका नं. ३

"गव्हाची १८६९ ते १८९२ पर्यंतची निर्यात"[२७]

| वर्ष | निर्यात गव्हाची मध्ये |
|---|---|
| १८६९ | २,७५,४८१ |
| १८७३-७४ | १७,५५,९५४ |
| १८८२-८३ | १,४१,९३,७६३ |
| १८९१-९२ | ३,२७,४०,००० |

"भारतातून इंग्लंडला गहू आणि भाताची निर्यात"[२८]

तालिका ४

| वर्ष | भात आणि गहू पौंडामध्ये Ib |
|---|---|
| १८४९ | ६,५८,००० |
| १८५८ | ३८,००,००० |
| १८७७ | ७९,००,००० |
| १९०१ | ९३,००,००० |
| १९१४ | १,९३,००,००० |

१८७७-७८ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे तर लोकांची क्रयशक्तीच संपुष्टात आली होती. लोकांना रोजगार पुरविण्यासाठी शासनाने दुष्काळी कामे काढली होती. परंतु ती पुरी पडली नाहीत. मात्र दुष्काळी कामाबाबत सरकारी अधिका-यानी सहानुभूतिशून्य कडक धोरण स्वीकारले होते. रोज एक आणा पुरुषाला व अर्धा आणा बायकांना व मुलांना मजूरी मिळत होती. गुरांना चारण्यासाठी घाटावरील जंगले खुली करण्यात आली. तरी या दुष्काळात चा-या अभावी हजारो गुरे तडफडून मेली आणि शेतीच्या प्रगतीला खिळ बसली.[२९] वारंवार पडणा-या दुष्काळामुळे व सरकारच्या योग्य उपाय योजने अभावी शेतकरी हा अधिकच गरिब होत गेला कि ज्यामुळे शेतीव्यवसायावर मोठेच संकट कोसळले होते. हे दुष्काळाचे संकट त्यानंतर नित्यनेमाने महाराष्ट्रावर येऊ लागले कारण पाटबंधा-यांची सोय इंग्रजांनी केली नाही.

या शेती प्रश्नावर त्या काळात मोठे विचार मंथन सुरु झाले होते या विचार मंथनाच्या दोन बाजू होत्या. न्यायमूर्ती रानडे व जी.व्ही. जोशी व सार्वजनिक सभेचे पुढारी महाराष्ट्राच्या भांडवली विकासासाठी रयतवारी पध्दतीऐवजी जमीनदारी पध्दतीचा पुरस्कार करीत होते. या नव्या जमीनदारांतूनच नव प्रागतिक वर्ग तयार होईल. व त्या वर्गाकडूनच ख-या अर्थाने देशाचा भांडवली विकास होईल असे त्याचे मत होते. त्या उलट फुले आणि काही प्रमाणात टिळक रयतवारी व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. पण रयतवारी व्यवस्थेमुळे शेतकरी समाजास अनेक संकटास तोंड द्यावे लागत होते. म. जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांनी या विषयाकडे लक्ष देऊन मूलगामी असे विचार व्यक्त केले.[३०]

७) महाराष्ट्राच्या शेती प्रश्नासंबंधी दोन दृष्टिकोन:

महाराष्ट्रातील दोन थोर विचारवंत म. जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांनी शेतक-यांच्या समस्या विषयी चर्चा केली आणि शेतक-यांच्या जीवनामध्ये बदल घडविण्यासाठी काही उपाय सूचविले.

म. जोतीराव फुले यांनी आपल्या प्रसिध्द शेतक-यांचा आसूड व गुलामगिरी या पुस्तकात असे मत व्यक्त केले की, शेतकरी हे त्यांच्या अज्ञानामुळे, दारिद्र्यामुळे पिळले जात आहेत. पेशवाईच्या काळामध्ये व त्यांच्यानंतरच्या सुरवातीच्या काळामध्ये शिक्षण मिळाले नाही. त्यामुळे त्यांची एकसारखी पिळवणूक होत आहे. तसेच प्रशासन व्यवस्थेमध्ये ब्राहमणांचे वर्चस्व होते. यामुळे सर्व कायदे, नियम, सवलती हे शेतक-यांच्या हिताविरोधी होते. इंग्रज अधिकारी हे सर्वस्वी ब्राहमण वर्गावरतीच प्रशासनासाठी आवलंबून होते. म.फुले नोकरशाही विषयी लिहितात कि, नोकरदारांना मोठमोठे पगार मिळतात; त्यांच्या चैनीवरती होणारा खर्च हा शेतक-यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. शेतकरी हे नोकरशाहीच्या पिळवणूकीतून मुक्त झाले पाहिजेत. सावकार व्याजास सव्वा व्याज घेऊन शेतक-याच्या सर्वनाशास कारणीभूत होतात. त्यांच्या जमिनी खरेदी करतात व शेतक-यांचे उदरनिर्वाहाचे साधनच नष्ट करतात. नोकरशाहीच्या फसवणूकीच्या धोरणापासून व सावकारांच्या अडवणूकीच्या धोरणापासून शेतक-यांना मुक्त करण्यासाठी त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांना कायदे-कानून, सवलती इत्यादीची माहिती मिळणे आवश्यक आहे. त्यांची

सर्वांगिण उन्नती होण्यासाठी शेती विकासासाठी आवश्यक ते धोरण आखले पाहिजे, त्यासाठी म. फुल्यांनी काही मार्ग सूचविले.

लोकमान्य टिळकांनी शेतक-यांच्या बिकट अवस्थेबद्दल संपादकीय लेख आपल्या "केसरी" या वर्तमान पत्रातून प्रसिध्द केले. यामध्ये त्यांनी शेतक-यांच्या अवनतीस प्रामुख्याने इंग्रजांना दोष दिला आहे. त्यांच्या शेतीविषयक असणा-या आडमुठी धोरणाला दोष दिला आहे. शेतक-यांवर लादण्यात आलेले मोठे मोठे शेतीविषयक कर, दुष्काळ परिस्थितीवर मात करण्याची कुचकामी योजना, नवीन निर्माण केलेले जंगल खाते, जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न इत्यादी कारणामुळे शेतकरी अधिकच कंगाल झाले, त्यांना दोन वेळचे जेवण मिळणे अशक्य झाले. यासाठी टिळक उपाय सुचविताना सांगतात कि इंग्रज सरकारने शेतक-याविषयीचे आपले शेतीचे धोरण बदलावे व शेतक--याविषयी अधिक उदार दृष्टिकोन स्वीकारुन त्यांच्या उन्नतीसाठी खास उपाय योजना राबवाव्यात. टिळकांनी शेतक-यांमध्ये राजकीय जागृती निर्माण करुन त्यांच्या चळवळी उभारण्याचे, त्यांना अनेक प्रश्नावर जागृत करण्याचे प्रयत्न केले.

म. जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक हे नव्याने उदयास आलेल्या मध्यमवर्गातील दोन वेगवेगळ्या विचार प्रवाहांचे प्रतिनिधी होते. त्यामुळे सहाजिकच त्यांच्यावर त्या विभागांच्या अशा आकांक्षांचा प्रभाव पडल्याचे स्पष्ट दिसून येते. या दोन नेत्यामध्ये शेतक-यांच्या अवनतीस कारणीभूत ठरलेल्या परिस्थिती विषयी तात्त्विक मतभेद आढळतात. पण दोघांचाही प्रयत्न रयतवारी व्यवस्थेस जास्त चांगल्या पायावर कसे उभे करावे हा होता. पण त्यांच्या उपाय योजना मात्र भिन्न होत्या.

८) अभ्यासाचा उद्देश आणि संशोधन पद्धती:

म. जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या शेतीविषयक विचारांचा तुलानात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत प्रबंधाचा मुख्य उद्देश आहे. वासाहतीक समाजामध्ये इंग्रज साम्राज्यशाहीने भारताचे अनेकांगाने शोषण केले त्यात बहुसंख्य शेतकरी वर्ग तर जास्तच पिळला गेला तो सरकार, नोकरशाही, सावकारशाही व व्यापारी यांच्याकडून पुरता नागवला गेला. या वसाहत्तिक शोषणाच्या संदर्भात शेतक-यांचा प्रश्न म. जोतीराव फुले आणि लोकमान्य टिळक यांनी कसा समजावून घेतला व तो सोडविण्यासाठी त्यांनी कोणकोणते उपाय सुचविले याचा तुलनात्मक अभ्यास या प्रबंधात करण्यात येणार आहे.

या अभ्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोणाचा स्वीकार केला असून म. फुले व लोकमान्य टिळक यांच्या लिखाणाचे विश्लेषण करून त्याच्या विचारांची तुलना करण्यात आली आहे. म. फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारातील साम्य व विरोध यांचा अभ्यास तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात केला आहे. लोकमान्य टिळकांचे शेती विषयक विचार अभ्यासित असतांना फक्त १९०८ पूर्वीच्या विचारांचाच येथे समावेश करण्यात आला आहे. १९१४ ते १९२० या काळातील त्यांचे विचार प्रस्तुत अभ्यासासाठी घेण्यात आलेले नाहीत.

## संदर्भ सूची

### प्रकरण पहिले:


१) Kumar R. — Western India in 19th Century Routledge & Kega Paul London, 1988-P-26.

२) दिवेकर वा.द. — अठराव्या शतकातील महाराष्ट्रात व्यापारी वर्गाचा उदय व अस्त, नवभारत, जाने., १९८४.

३) औटी व्ही.बी. व अशोक चौसाळकर — म. जोतीराव फुले यांच्या विचारांचे राजकीय स्वरूप, शोधनिबंध, तिसरे, महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषद, पृ.२०

४) Shinde J.R. — Dynamics of cultural revolution 19th century Maharashtra. Ajanta Publication, Jawahar Nagar, Delhi-7, 1985 P-15

५) सरदार गं.बा. — महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, दिनकर गंगाल, अभिनववाचक चळवळ, मुंबई १४, नोव्हेंबर, १९८२, पृष्ट ७९.

६) कीर धनंजय — महात्मा फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, रामदास भटकळ, पाप्युलर प्रकाशन, मुंबई-३४, पृ. २०८.

Tarachand — History of the freedom movement in India volume-II, Bord costing Govt. of India New Delhi - 1 P-282.

Ibid — P-286

Ibid — P-290

१०) साळुंखे पी·बी·  महात्मा फुले गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई-३२, जुलै, १९८२, पृ· ५२८·

११) कीर धनंजय  महात्मा जोतीराव फुले आमच्या समाज क्रांतीचे जनक, रामदास भटकळ, मुंबई-३४ पृ·२१२·

१२) Shinde J.R.  Op. Cit P.121

१३) Kumar Ravindra  Essays Social History of Modern India P-9

१४) जोशी ना·वि·  पुणे वर्णन संपा·गं·दे·खानोलकर, दुसरी आवृत्ती, १९७१, पृ·६१·

१५) लोकहितवादी शतपत्रे संपादक श्री·रा·टिकेकर, पृ·३२०-२१·

१६) शेजवळकर त्र्यं·शं· शेजवळकरांचे लेख भाग-२, प्रका·ह·वि·मोरे, प्रकाशन १ली आवृत्ती, १९५९, पृ· २७·

१७) सरदार गंबा·(सं)  महाराष्ट्र जीवन परंपरा खंड-१, दे·श्री·जोशी, व म·द· लोखंडे, १९६०, पृ·१५९·

१८) सरदार गं·बा·(सं·)  महाराष्ट्र जीवन आणि परंपरा खंड-२, आवृत्ती १९६०, पृ· ४९३·

१९) पंडित नलिनी  महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, नलिनी पंडित, बाबुली, निवास, माहीम, मुंबई-१६, प्रथम आ·१९५५, पृ·३४·

२०) L. Natrajan  Peasant uprising in India, 1850-1900, P.54

२०) सरदार गं·बा· — महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, सं·दिनकर गंगाल, चिटणीस मुंबई-२४, प्र·१९८२ पृ·१८२-८३·

२ ) Tarachand — Op. Cit P-298

२ ) Ibid — P-298

२ ) Gokose Shankar — Political Ideas and Movement in India P-2

२ ) वैद्य मा·म· व दलाल प्र·दा· — सं·दामोदर नारायण गोखे, कपिलेश्वर रस्ता, कोल्हापूर· पृ·१५५·

२ ) R.C. Mujumdar (Ed) — British Parmountry & Indian Renaissance, II edition, 1970.

२६) Ibid — P-886

२५) Bipan Chandra — Rise & Growth of Economic Nationalism in India P-163

२६) सरदार गं·बा· — महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, लोखंडे आणि जोशी· प्र·आ·जून, १९८१, पृ·१८४·

२९) Shinde J.R. — Op. Cit P-123


·:::·